# मिरा भाईंदर महानगरपालिका

अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालय,
जा.क्र.मनपा/अ.आ.१/७०/२०२५-२६
दि. १५/०५/२०२५

**आदेश-१ :**

**अंमलबजावणी दिनांक — दि. १६/०५/२०२५**

**विषय :- पावसाळापुर्व सखोल स्वच्छता अभियान (Pre-Monsoon Deep Clean Drive)**

स्वच्छ भारत अभियान २.० आणि राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP) या संकल्पनेला मुर्त स्वरुप देण्यासाठी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य निर्देशानुसार (Deep Clean Drive) या कार्यक्रमाचे यापूर्वी आयोजन करण्यात आलेले होते. त्याच धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये दि. १६/०५/२०२५ रोजी पावसाळापुर्व सखोल स्वच्छता अभियान (Pre-Monsoon Deep Clean Drive) आयोजीत करण्यात येत आहे. शहरातील हवा स्वच्छ राहण्यासाठी धुळीकण कमी करणे आणि एकंदरीत संपूर्ण शहरातील मुख्य आणि अंतर्गत रस्ते सखोल पध्दतीने स्वच्छ करुन धुवून घेणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.

सदर कार्यक्रमाकरिता खालीलप्रमाणे नमूद सर्व अधिकारी / कर्मचारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी हनुमान मंदिर, नवघर नाका येथे दि. १६/०५/२०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता उपस्थित राहावयाचे आहे. तसेच मा. आयुक्त यांचे संबोधन व स्वच्छता शपथ झालेनंतर आपणांस नेमून दिलेल्या ठिकाणी स्वच्छता मोहिम राबवून त्याचे जिओ टॅग फोटो व कामाचा अहवाल सादर करण्यात यावा.

| टिम क्रमांक | स्वच्छता परिसर / ठिकाणे | कर्मचारी यांचे नाव | अधिकारी / कर्मचारी यांचे नाव | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| टिम क्र. १ | १. नवघर नाका हनुमान मंदिर संपूर्ण परिसर<br>२. हनुमान मंदिर ते दत्त मंदिर अंतर्गत परिसर<br>३. मच्छी मार्केट ते स्मशान भुमी अंतर्गत रस्ते | • श्री. श्रीकांत पराडकर, स्वच्छता निरिक्षक<br>• श्री. दिपक मोहिते, स्वच्छता निरिक्षक<br>• श्री. सचिन साळुंखे, अतिक्रमण पथक प्रमुख<br>• श्री. तुषार काळे, ठेका उद्यान अधिक्षक<br>• श्री. रमेश चव्हाण, ठेका उद्यान अधिक्षक<br>• श्री. तुषार, मुकादम, ९६५३४५००८०<br>• श्री. रवी, मुकादम, ९०२९८४५४४०<br>• श्री. प्रवेश पाटील, मुकादम, ९५२७६७७८८१<br>श्री. भूपती, मुकादम, ८४३३९१११६१ | • श्री. योगेश गुणिजन, सहा. आयुक्त (घ.व्य.)<br>• श्री. चेतन म्हात्रे, शाखा अभियंता<br>• श्री. प्रकाश पवार, स्वच्छता अधिकारी, ८४३३९१११७० | डॉ. सचिन बांगर, प्र. अतिरिक्त आयुक्त १ |

Scanned with OKEN Scanner

| टिम क्रमांक | स्वच्छता परिसर / ठिकाणे | कर्मचारी यांचे नाव | अधिकारी / कर्मचारी यांचे नाव | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| टिम क्र. २ | १. एस.एन.कॉलेज संपूर्ण परिसर<br>२. इंदिरा नगर झोपडपट्टी संपूर्ण परिसर<br>३. धन निरंकारी रस्ता संपूर्ण परिसर | • श्री. रमेश घरत, स्वच्छता निरिक्षक<br>• श्री. विनोद जमदाडे, स्वच्छता निरिक्षक<br>• श्री. भैरु नाई, अतिक्रमण पथक प्रमुख<br>• श्री. मुरली पाटील, अतिक्रमण पथक प्रमुख<br>• श्री. तुषार ठाकुर, ठेका उद्यान अधिक्षक<br>• श्री. जगदिश, मुकादम, ८३६९५११५१२<br>• श्री. संदीप राऊत, मुकादम, ८६५५६९०९३२<br>• श्री. अर्जुन, मुकादम, ९२२३५०९९९७<br>• श्री. मुकेश, मुकादम, ९१६७३६४३६२ | • श्री. प्रफुल्ल वानखेडे, शाखा अभियंता<br>• श्री. कांतीलाल बांगर, स्वच्छता निरिक्षक, ८४३३९१११७७ | डॉ. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त २<br>श्री. प्रसाद शिंगटे, उप-आयुक्त |
| टिम क्र. ३ | १. हनुमान मंदिर ते भाईंदर (पुर्व) स्टेशन रोड संपूर्ण परिसर व अंतर्गत रस्ते | • श्री. श्रीकांत धीवर, स्वच्छता निरिक्षक<br>• श्री. नितीन बर्नवाल, स्वच्छता निरिक्षक<br>• श्री. राजेंद्र माने, अतिक्रमण पथक प्रमुख<br>• श्रीम. योजना जाधव, ठेका उद्यान अधिक्षक<br>• श्री. अजित कोरे, ठेका उद्यान अधिक्षक<br>• श्री. मिलिंद वाडेकर, मुकादम, ९९८७१५२७७४<br>• श्री. कुमार पाटील, मुकादम, ९०२९९३२१२१<br>• श्री. राजा, मुकादम, ८६५५२५८१४१<br>• श्री. रमेश गुजारे, मुकादम, ८१०४०७८०३१ | • श्री. प्रविण दळवी, शाखा अभियंता<br>• श्री. नितीन खैरे, स्वच्छता निरिक्षक, ८४२२८११२८९ | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता |
| टिम क्र. ४ | १. हनुमान मंदिर ते गोडदेव नाका<br>२. महाराणा प्रताप पुतळा संपूर्ण परिसर<br>३. विमल डेअरी ते प्रफुल्ल पाटील चौक<br>४. कजरी स्वीटस् ते बी पी रोड | • श्री. रविंद्र पाटील, स्वच्छता निरिक्षक<br>• रेवनाथ कोळपे, स्वच्छता निरिक्षक (ठेका)<br>• श्री. राकेश त्रिभुवन, अतिक्रमण पथक प्रमुख<br>• श्री. किरण जाधव, अतिक्रमण पथक प्रमुख<br>• श्री. हितेश राठोड, ठेका उद्यान अधिक्षक | • श्री. संदीप साळवे, शाखा अभियंता<br>• श्री. अनिल राठोड, स्वच्छता निरिक्षक, ८४२२८११२९५ | श्रीम. कल्पिता पिंपळे, उप-आयुक्त (मु.) |

Scanned with OKEN Scanner

| टिम क्रमांक | स्वच्छता परिसर / ठिकाणे | कर्मचारी यांचे नाव | अधिकारी / कर्मचारी यांचे नाव | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| | | • श्री. गणेश म्हात्रे, मुकादम ९८९२७५७६४१<br>• श्री. प्रशांत पाटील, मुकादम ८३६९९०७१९८<br>• श्री. सिध्देश, मुकादम ८०९७८४४६७८<br>• श्री. मंगेश पाटील, मुकादम ७०४५६००४३३ | | |

उपरोक्त अधिकारी व कर्मचारी यांनी दि. १६/०५/२०२५ या दिवशी दिलेल्या प्रभाग समितीमध्ये जोडपत्रात नमूद केल्याप्रमाणे कामे करावी.

**कामाची व्याप्ती :-** उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे शहरातील **प्रभाग समिती क्र. ३** या ठिकाणी प्रत्येक पथकाला कामाचे ठिकाण नमुद करुन देण्यात आलेले आहे. तेवढ्याच क्षेत्रामध्ये सखोल स्वच्छता मोहीम राबविण्याचे आहे.

**कामाची वेळ :-** सकाळी ८.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत

**सहभागी प्रतिनीधी :-** सर्व नियुक्त अधिकारी/ कर्मचारी, पत्रकार, महिला बचत गट, अशासकिय संस्था प्रतिनिधी व त्या भागातील राजकीय पक्षाचे प्रतिनीधी प्रमुख सन्माननीय व्यक्ती इ. यांना संबंधित प्रभाग समिती क्र. ३ यांनी निमंत्रीत करावे.

**कामाची कार्य पध्दती (SOP) :-**

१. सर्व नियंत्रण अधिकारी यांनी सकाळी ८.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत आपल्या अधिनस्त पथकांवर पूर्ण वेळ नियंत्रण ठेवावे. नियंत्रण अधिकारी यांनी संबधित विभागप्रमुख यांचे समवेत बैठक घेऊन आपल्या कार्यक्षेत्रातील आवश्यक त्या कामाचे नियोजन करावे आणि कोणत्या ठिकाणी किती कामगार/ मशिन लावणे आवश्यक आहे याचे सुक्ष्म नियोजन करावे.
२. प्रत्येक पथक प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी/ कर्मचारी हजर आहेत याची खात्री करावी आणि सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून जोडपत्रामध्ये नमुद केलेली सर्व कामे होतील याची दक्षता घ्यावी.
३. सखोल स्वच्छता अभियान सुरु झाल्यानंतर संपूर्ण क्षेत्र नियुक्त कर्मचारी यांचेकडून ब्रशद्वारे, मशीनद्वारे स्वच्छ करुन घ्यावे आणि हे झाल्याची खात्री झाल्यानंतर रस्ते, फुटपाथ, डिव्हायडर यांची स्वच्छता पाण्याद्वारे करुन घ्यावी.
४. सर्व नियुक्त सफाई कामगार गणवेशामध्ये तसेच आवश्यक त्या सुरक्षा उपकरणासह हजर असतील याची खात्री करावी.
५. सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात येत असलेल्या वॉर्डामध्ये घनकचऱ्यामध्ये नमुद नसलेले सर्व प्रकारचे साहित्य गोळा करण्यासाठी स्वतंत्र वाहनाची व्यवस्था करण्यात यावी आणि मोहीम संपल्यानंतर त्याची रितसर विल्हेवाट लावण्यात यावी यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभाग जबाबदार असेल.
६. संपूर्ण मोहीम नमुद केलेल्या वार्ड मधील प्रत्येक मुख्य आणि अंतर्गत रस्त्यामध्ये राबविण्यात यावी.

**प्रसिध्दी :-** श्री. राजकुमार घरत, सिस्टिम मॅनेजर यांनी सदर कामाचे फोटो/ व्हिडीओ काढणे व त्यांची वृत्तपत्रात, सोशल मिडीया मध्ये प्रसिध्दी देणे, सदर मोहिमेसाठी आवश्यक लागणारे साहित्य वस्तु यांचे अहवाल संबधित अधिकारी यांनी संबधित ठेकेदाराकडून प्राप्त करून घेणे याबाबत उचित कार्यवाही करावी. मोहिमे अंतर्गत पूर्वीचे आणि नंतरचे असे जोडफोटो घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्याकडे सादर करावेत.

**(डॉ. सचिन बांगर)**
**अतिरिक्त आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

**१. अतिरिक्त आयुक्त**
**२. संबधित उप-आयुक्त (सर्व)**
**३. संबधित विभाग प्रमुख / खातेप्रमुख**
**४. प्रभाग अधिकारी (प्रभाग समिती क्र. १ ते ६)**
**५. सर्व अधिकारी / कर्मचारी**

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // जोडपत्र //

| अ.क्र. | करावयाची कारवाई | विभाग |
|---|---|---|
| १ | १. प्रभाग समिती परिसरातील सर्व रस्ते, डिव्हायडर, फुटपाथ यांची बॅरीकेड्स व भिंती ब्रशद्वारे सखोल स्वच्छ करुन घेणे.<br>२. रस्त्यावर व मोकळ्या प्लॉटवर पडलेले डेब्रीज उचलणे.<br>३. खुल्या भुखंडावरील कचरा उचलणे व संबंधीत जागा मालकास नोटीस देऊन यापुढे कचरा राहणार नाही याबाबत दक्षता घेणे.<br>४. स्मशानभुमी पाहणी करुन योग्यती स्वच्छता करुन घेणे.<br>५. खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी रस्त्यावर कचऱ्याचे डबे व हात धुण्यासाठी बेसिन ठेवले आहेत. त्यामुळे रस्त्यावर पाणी व कचरा पडून विद्रुपीकरण होत असुन याबाबत दंडात्मक कारवाई करणे व नोटीस देणे.<br>६. सार्वजनिक ठिकाणांवरील स्टिकर्स, पोस्टर काढणे.<br>७. नमूद केलेल्या ठिकाणावरील स्मारके पुतळे यांची सफाई करणे.<br>८. रस्त्यांचे, चौकांचे नावाचे बोर्ड स्वच्छ करुन घेण्यात यावे. त्यावर असणाऱ्या स्टिकर्स, जाहिराती काढुन घेण्यात याव्यात.<br>९. पान, गुटखा खाऊन धुंकलेल्या फुटपाथ, डिव्हायडर, रस्ते अशा सर्व जागा स्वच्छ करुन घेण्यात याव्या.<br>१०. रस्त्यालगत असलेल्या सर्व लिटर बिन्स, ट्विन बिन्स, ट्रिगार्ड स्वच्छ करुन घेण्यात यावे.<br>११. ज्या ठिकाणी वाहन पार्क केलेले आहेत त्या वाहनाच्या खालील कचरा देखील स्वच्छ करण्यात यावा. | **<u>श्री. योगेश गुणिजन, घनकचरा व्यवस्थापन विभाग</u>** |
| २ | **वृक्ष प्राधिकरण विभागाने खालील कार्यवाही मोहीम सुरु होण्याच्या आधी पूर्ण करुन घ्यावी.**<br>१. झाडांच्या बुंध्याशी असलेला कचरा उचलण्यात यावा.<br>२. नमूद केलेल्या ठिकाणावरील डिव्हायडर पाण्याने धुवून घेणे.<br>३. डीव्हायडर तसेच रस्त्यालगत लावण्यात आलेली झाडूतुन अतिरिक्त माती काढून घेणे जेणेकरुन सदर माती रस्त्यावर पडून नये याची दक्षता घेण्यात यावी.<br>४. डीव्हायडर तसेच रस्त्यालगत असलेली झाडांची झाटणी मोहीमेपुर्वी करुन घेण्यात यावी.<br>५. फुटपाथवर छाटणी केलेल्या झाडांचा पाला-पाचोळा व सुकलेल्या झाडांच्या झावळ्या/फांद्या उचलण्यात याव्यात.<br>६. रस्त्याच्या बाजूला वाढलेली गवत/झुडपे काढण्यात यावी व उचलण्यात याव्यात.<br>७. रस्ता दुभाजक मधील वाढलेली झाडे छाटणी करणे व उचलण्यात याव्यात.<br>८. मिरारोड स्टेशन (प्रभाग समिती ५) मधील फाऊंटनची दुरुस्ती करुन कार्यरत करण्यात यावे.<br>९. झाडांच्या बुंध्याला थुंकलेले असेल तर ते धुवून चुना मारुन घेणे. | **<u>श्री. नागेश विरकर, वृक्ष प्राधिकरण विभाग</u>** |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | करावयाची कारवाई | विभाग |
|---|---|---|
| ३ | **सार्व. बांधकाम विभागाने खालील कार्यवाही मोहीम सुरु होण्याच्या आधी पूर्ण करुन घ्यावी.**<br>१. गटारावरील झाकणे तुटलेली असल्यास नवीन झाकणे बसविण्यात यावीत.<br>२. रस्त्यावर खड्डे बुजवणे फुटपाथ कडेला साईड पट्टीला डांबरीकरण करण्यात यावे.<br>३. इलेक्ट्रीक बोर्ड, डीपी उघडे पडलेले असल्यास ते सुस्थितीत करण्यात यावे.<br>४. पदपथ/नाल्यावरील स्लॅब/ब्लॉक उखडले असल्यास सुस्थितीत करण्यात यावे.<br>५. दिशा दर्शक फलक, लेन मार्किंग व्यवस्थितीत करणे.<br>६. चालु कामाचे बॅरेकेडींग केले आहेत त्याची खात्री करणे, डेब्रीज उचलण्यास सांगणे.<br>७. डिव्हायडर तुट फुट दुरूस्ती करून घेणे.<br>८. माहिती दर्शविणारे फलक बसविल्याची खात्री करणे.<br>९. काम पूर्ण झाल्यानंतर डेब्रीज उचलुन घेतल्याची खात्री करणे.<br>१०. बांधकाम साहित्य योग्यरित्या न रचल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची खात्री करणे.<br>११. सर्व रस्त्यावरील खड्डे बांधकाम विभागाने बुजवून घ्यावेत. | **श्री. नितीन मुकणे, सार्व. बांधकाम / विद्युत विभाग** |
| ५ | १. रस्त्याकडेला गाई बांधण्यात येतात त्यांच्यावर कारवाई करणे.<br>२. मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे. | **डॉ. विक्रम निराटले, पशु वैद्यकीय विभाग** |
| ६ | **अतिक्रमण विभागाने खालील कार्यवाही मोहीम सुरु होण्याच्या आधी पूर्ण करुन घ्यावी.**<br>१. रस्त्यांवर बेवारस दुचाकी व चार चाकी वाहने पडलेली आहेत यांच्यावर कारवाई करणे.<br>२. इलेक्ट्रीक पोल, झाडांवर व इतर ठिकाणी अनधिकृत बोर्ड, जाहीराती काढण्यात याव्यात.<br>३. मुख्य चौक फेन्सिंग केलेल्या जागेवर कचरा आणि प्लास्टीकचे आवरण असलेले तंबू बांधण्यात आले असल्यास कारवाई करणे.<br>४. नो पार्किंग झोन मध्ये अनधिकृतपणे वाहने उभी करण्यात आलेली असल्यास वाहतुक शाखेला कळवुन कारवाई करणे.<br>५. अनधिकृतपणे रस्त्यावर गॅरेज/ वाहने उभी करण्यात आलेली असुन रहदारीस अडथळा निर्माण होत असुन रस्त्यावर ऑईल व घाण पडून रहाते यांच्यावर कारवाई करण्यात यावी.<br>६. मनपाने तयार केलेल्या भाजी मार्केट मध्ये फेरीवाले न बसता रस्त्यावर बसतात. यांच्यावर कारवाई करण्यात यावी.<br>७. पद पथावरील/वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे स्टँडी फलक तसेच इतर साहित्य उचलून घेणे.<br>८. रस्त्याच्या मधोमध किंवा बाजुला लोंबकळणाऱ्या सर्व वायर, धागे काढुन घेण्यात यावी.<br>९. सखोल स्वच्छता घेण्यात येणाऱ्या क्षेत्रात रस्ते आणि फुटपाथ यावर अनधिकृत फेरीवाले बसणार नाहीत याची दक्षता किमान २ दिवस आधीपासून घेण्यात यावी. यासाठी संबंधित सहा. आयुक्त जबाबदार असतील | **श्री. नरेंद्र चव्हाण, अतिक्रमण विभाग**<br><br>**श्री. दत्तात्रेय वरकुटे, प्रभाग क्र. ०३** |
| ७ | १. NCAP मधील प्राप्त वाहने रस्ते, डिव्हायडर, फुटपाथ धुण्यासाठी व रोडच्या कडेच्या ठिकाणची झाडे पुर्नवापर पाण्याने फवारणी करण्यासाठी तसेच जनजागृतीकरिता IEC वाहन मोहिमेच्या ठिकाणी उपलब्ध करुन देणे. | **श्री. योगेश गुणिजन, पर्यावरण विभाग** |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | करावयाची कारवाई | विभाग |
|---|---|---|
| ८ | १. अग्निशमन विभागाने मोहिमेच्या ठिकाणी अग्निशमन वाहने उपलब्ध करुन देण्यात यावी. | **श्री. प्रकाश बोराडे, अग्निशमन विभाग** |
| ९ | **पाणीपुरवठा व मलनि:सारण विभागाने खालील कार्यवाही मोहीम सुरु होण्याच्या आधी पूर्ण करुन घ्यावी.**<br>१. शहरातील भुयारी गटारांवरील मॅनहोल झाकणे सुस्थितीत करणे.<br>२. मलनि:सारण केंद्राला भेट देऊन दुर्गंधी येणार नाही याबाबत योग्य ती उपाययोजना करणे.<br>३. मलनि:सारण केंद्रातील प्रक्रिया केलेल्या पाण्याचा दर्जा व वापर तपासणे.<br>४. ओव्हर फ्लो होवून रस्त्यावर दुर्गंधी पसरणाऱ्या वाहीनींची दुरुस्ती करुन घेणे.<br>५. रस्ते सफाई करीता जेट स्प्रे मशिन विभागाकडे असल्यास उपलब्ध करुन देणे.<br>६. सखोल स्वचछता करीता पुर्नवापर पाण्याची व्यवस्था करणे आणि त्यासाठी आवश्यक तेवढ्या टँकरची सुविधा उपलब्ध करुन घेणे.<br>७. या मोहिमे अंतर्गत रस्ते, फुटपाथ, डिव्हायडर धुण्यासाठी आवश्यक असलेल्या पाण्याचे नियोजन पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाने करावयाचे आहे. एसटीपी प्रकल्पातील पुनर्प्रक्रिया केलेले पाणी या मोहिमेसाठी वापरण्यात यावे. | **श्री. शरद नानेगांवकर, पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग** |

Scanned with OKEN Scanner